**ठळक बातम्या**

- नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त, तसंच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त राज्यात विविध कार्यक्रम
- दावोस जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक परिषदेत महाराष्ट्रानं केले दोन दिवसांत १५ लाख ७० हजार कोटी रुपयांचे ५४ सामंजस्य करार
- कुख्यात गुंड छोटा राजन याचा हस्तक डी. के. राव मुंबई पोलिसांच्या ताब्यात
- जळगाव जिल्ह्यात परधाडे स्थानकाजवळ काल संध्याकाळी झालेल्या रेल्वे अपघातात मृतांची संख्या १३

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या सत्राला आजपासून सुरुवात

**<><><><><>**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली अर्पण केली. नेताजींचा जन्मदिवस पराक्रम दिवस म्हणून साजरा केला जात आहे. नेताजी स्वातंत्र्यलढ्यातील सर्वात प्रेरणादायी नेत्यांपैकी  एक होते, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. नेताजींनी लाखो लोकांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची प्रेरणा दिली, स्वातंत्र्य मिळवण्यासाठीचा त्यांचा अथक लढा आणि आझाद हिंद फौजेचं त्यांचं साहसी नेतृत्व येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरित करत राहील असं राष्ट्रपती म्हणाल्या.

नेताजींचं समर्पण आणि आझाद हिंद फौजेची निर्मिती हा त्यांच्या शौर्याचा पुरावा आहे असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले. तर नेताजी सुभाषचं्द्र बोस यांचं स्वातंत्रलढ्यातील योगदान अतुलनीय आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये प्रधानमंत्र्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला अभिवादन केलं. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस यांना आदरांजली वाहिली.

दरम्यान, सांस्कृतिक मंत्रालयानं नेताजींच्या जन्मस्थानी ओडिशातल्या कटक इथं तीन दिवसांचा उत्सव आयोजित केला आहे.

शिवसेनेचे संस्थापक **बाळासाहेब ठाकरे** यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली अर्पण केली. बाळासाहेब ठाकरे त्यांच्या लोककल्याण आणि महाराष्ट्राच्या विकासासाठीच्या वचनबद्धतेबद्दल ओळखले जातात, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**राज्यपाल** सी. पी. राधाकृष्णन यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना जयंतीनिमित्त राजभवन इथं आदरांजली वाहिली.

मुंबई इथं मंत्रालयात पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला फुलं वाहून अभिवादन केलं.

**<><><><><>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह उद्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. मुंबईत होणाऱ्या एका कार्यक्रमात राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि

विकास महामंडळाच्या कॉर्पोरेट कार्यालयाचं उद्घाटन शाह यांच्या हस्ते होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ निमित्तानं वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या दिनदर्शिकेचं प्रकाशन आणि देशभर नव्यानं स्थापन झालेल्या १० हजार नवीन बहुउद्देशीय सहकारी संस्थांसाठीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात अमित शाह यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

**<><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगाने नवी दिल्ली इथं दोन दिवसांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन आजपासून केलं आहे. परिषदेच्या उद्घाटनाला मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांची उपस्थिती होती. जगातल्या इतर निवडणूक यंत्रणांच्या अध्यक्ष आणि सरचिटणीस यांच्यासह तेरा निवडणूक व्यवस्थापन संस्थांचे जवळपास ३० प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित आहेत. निवडणूक व्यवस्थापनामध्ये येणाऱ्या अडचणींविषयी या परिषदेत चर्चा होणार आहे.

लोकशाही देशातील निवडणुकीचं भवितव्य हे तंत्रज्ञानाच्या प्रगतीवर, राजकीय प्रचारात, निवडणूक कार्यपद्धतीत कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर यावर अवलंबून आहे, असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यावेळी म्हणाले.

**<><><><>**

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक परिषदेत गेल्या दोन दिवसांत राज्यात १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणणाऱ्या  ५४ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विविध उद्योगसमूहांशी बैठका घेतल्या. या करारांमुळं अंदाजे

१६ लाख रोजगार निर्मितीची अपेक्षा आहे. त्यापैकी एक महत्त्वाचा करार एमएसएन होल्डिंग्ज लिमिटेडसोबत झाला असून, त्यात राज्याच्या 'अल्ट्रा मेगा प्रोजेक्ट' उपक्रमांतर्गतच्या प्रगत लिथियम बॅटरी आणि सेल उत्पादन प्रकल्प स्थापन करण्याच्या योजनेचा समावेश आहे.

गेल्या दोन दिवसांत झालेल्या करारांमधून राज्याच्या सर्व भागात गुंतवणूक केली जात असून त्यामुळे समतोल विकासाच्या मार्गाने राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर्स करण्याचे उद्दीष्ट साध्य  होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

कृष्णा नदीतलं पुराचं पाणी मराठवाड्यात नेण्याचं नियोजन असून त्याबाबतच्या प्रकल्पास जागतिक बँकेनं मंजूरी दिली आहे. जागतिक बँकेचं एक पथक उद्या, २४ तारखेला यासाठी सांगली दौऱ्यावर येत आहे. या भागातील सांडपाणी प्रकल्पाची, अवर्षण प्रवण भागाची पाहणी पथकाकडून केली जाणार आहे. तसंच पथक कृष्णा नदी आणि परिसरात राहणाऱ्या कुटुंबांच्या भेटी घेणार आहे. या प्रकल्पासाठी तीन हजार २०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, त्यापैकी दोन हजार ३३८ कोटी रुपयांचं अर्थसहाय्य जागतिक बँक करणार आहे.

**<><><><><>**

नागपूर आणि आसपासच्या परिसरातली  दीक्षाभूमी, ताजबाग तसंच रामटेक आणि इतर धार्मिक स्थळं यांच्या विकासाबाबत लवकरच बैठका घेऊन उपाययोजना करणार असल्याचं महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सांगितलं. नागपूरच्या प्रेस क्लब तर्फे आयोजित सत्कार आणि पत्रकारांशी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. दावोस मध्ये झालेल्या करारांच्या माध्यामातून राज्य अधिक जोमाने प्रगती करेल असं विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

कुख्यात गुंड छोटा राजन याचा हस्तक डी. के. राव याच्यासह सहा जणांना मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं खंडणी प्रकरणी अटक केली आहे. एका हॉटेल मालकाला जीवे मारण्याची धमकी देऊन अडीच कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकानं त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे.

<><><><><>

जळगाव जिल्ह्यात परधाडे स्थानकाजवळ काल संध्याकाळी झालेल्या रेल्वे अपघातात मृतांची संख्या १३ झाली आहे. त्यातल्या १० जणांची ओळख पटली असून त्यात  एक लहान मूल आणि तीन महिलांचा समावेश आहे.

शेजारच्या डब्यात आग लागल्याची अफवा पसरल्यामुळं अपघातग्रस्त डब्यातल्या अनेकांनी गाडीतून बाहेर उड्या मारल्या आणि ते भरधाव वेगाने येणाऱ्या कर्नाटक एक्सप्रेसखाली सापडले असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज वार्ताहरांना सांगितलं. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आणि पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, यांनी घटनास्थळी भेट दिली.

जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयातील ०२५७- २२ १७ १९३ क्रमांकावर हेल्पलाईन सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. मदत कार्य रात्री उशिरापर्यंत सुरू होतं. अपघातामुळं मुंबईकडून येणाऱ्या जाणाऱ्या सुमारे ८ गाड्या दीड ते दोन तास खोळंबल्या होत्या. मात्र आता रेल्वे वाहतूक पूर्ववत झाल्याचं पवार यांनी सांगितलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त करत मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक साहाय्य जाहीर केलं.

<><><><><>

उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्वयंसहाय्यता गटांनी तयार  केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या उद्देशानं मिनी सरस प्रदर्शन सध्या सांगलीत भरलं आहे. बचत गटांच्या  उत्पादनांचे ५४ स्टॉल आणि खाद्यपदार्थांचे २१ स्टॉल अशी ७५ दालनं प्रदर्शनात आहेत.  गोंदिया इथंही सध्या मिनी सरस प्रदर्शन भरलं आहे.

**<><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या खाडी भागां मध्ये सध्या स्थानिक स्थलांतरित पक्षी स्पॉटबिल्ड डक म्हणजेच हळदीकुंकू बदकाचे थवे दिसून येत आहेत. त्यामुळे पक्षी मित्रांना पक्षी निरीक्षणाची चांगलीच पर्वणी लाभली आहे. त्याविषयी अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून….

**व्हॉईस कास्ट - नीता चौरे**

**<><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या सत्राला आजपासून सुरुवात झाली. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबई संघाचा सामना आज जम्मू-काश्मीर संघाशी सुरू झाला. या सामन्यात नाणेफेक जिंकून मुंबई संघाने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र, शार्दुल ठाकूरचं अर्धशतक वगळता अन्य कोणत्याही फलंदाजाला यश न आल्याने मुंबई संघाची सुरुवात खराब झाली. रोहित शर्मा, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, अजिंक्य रहाणे हे झटपट तंबूत परतल्याने मुंबईचा पहिला डाव गडगडला आहे.

**<><><><>**

एकोणीस वर्षांखालच्या महिला क्रिकेट टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत, आज क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या सामन्यात भारतानं श्रीलंकेपुढं विजयासाठी ११९ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. भारतानं निर्धारित २० षटकांत ९ बाद ११८ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना श्रालंकेची सुरुवात खराब झाली. सुरुवातीच्या २४ चेंडूत अवघ्या १२ धावात त्यांच्या ५ फलंदाज तंबूत परतल्या.